# प्रेसनोट दि.२२/०३/२०१९

## डेक्कन पोलीस स्टेशन पुणे शहर

दिनांक २०/०३/२०१९ रोजी रात्रौ पोलीस शिपाई ८१४६ बडगे व पोलीस शिपाई ९८६१ गायकवाड असे डेक्कन सी.आर.मोबाईल मधुन रात्र गस्त करीत असताना आपटे रोड येथे १०/४३ वा. चे सुमारास केशवराव भोळे चौक मधुन जात असताना होन्डाई क्रेटा एम एच १९ डी जी ७१७१ ही पार्क केलेली दिसली. गाडीची काच फुटलेली असल्याने सी.आर. मोबाईल थांबवुन गाडीची पाहणी केली असता,गाडीमध्ये १ लाख ५ हजार रुपये किंमतीचा ॲप्पल कंपनीचा लॅपटॉप बॅगमध्ये मिळून आला. गाडी मालका बाबत चौकशी करीता थोड्या वेळाने गाडी मालक विशाल गुलाब देवकर,रा.जळगांव हे आल्याने त्यांच्याकडे चौकशी करता, त्यांनी सदर ठिकाणी गाडी पार्क करुन गाडीमध्ये लॅपटॉपची बॅग ठेवुन कामासाठी गेले होते. त्यांनी गाडीची काच फुटलेली पाहुन गाडीतील लॅपटॉप चोरीस गेला असे म्हणाले परंतु पोलीस शिपाई ८१४६ बडगे व पोलीस शिपाई ९८६१ गायकवाड यांनी लॅपटॉपची बॅग त्यांच्या ताब्यात दिली. त्यामुळे विशाल गुलाब देवकर यांनी पोलीसांचे कौतुक करुन आभार मानले. तसेच डेक्कन पोलीस स्टेशन येथे येवुन दिपक लगड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना भेटुन पोलीसांचे मुळे लॅपटॉप मिळाल्याचे सांगुन पुन्हा पोलीसांचे आभार मानले.

